पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, मे २०२०, खंड १९, अंक २, पृष्ठे ३२

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● अक्रीत

५ ● 'कोविड'ने शिकविलेला धडा

१३ ● प्रश्न...जैवविविधतेच्या अस्तित्त्वाचा

१७ ● हिमनद्या धोक्यात

२१ ● महिलांवरील अत्याचारांचे भीषण वास्तव


भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी


**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.



वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispepune@gmail.com
www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**
**खंड १९ (अंक २) मे २०२०**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**


*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# अक्रीत

ज्याचे नावही कधी ऐकलेले नव्हते असा आणि साध्या डोळ्यांना दिसू न शकणारा असा एखादा सूक्ष्मतम विषाणू उभ्या मानवजातीला वेठीस धरेल, असे कधी स्वप्नातही वाटले नव्हते. परंतु, नेमके तेच अक्रीत आज आपल्या आजुबाजूला आकार घेते आहे. 'कोविड १९' अथवा 'कोरोना' ही संज्ञा गेल्या वर्षीच्या साधारण नोव्हेंबर महिन्यापासून आपल्या कानावर पडू लागली. चीनमधील हुबेई प्रांताची राजधानी असलेल्या वुहान या शहरामध्ये हा विषाणू प्रथम अवतरला असेही सा-या जगाने ऐकले. मध्य चीनमधील सर्वाधिक लोकवस्ती असलेल्या या वुहान शहरातील (कु)प्रसिद्ध अशा मांसमच्छीच्या बाजारपेठेमध्ये 'कोरोना' प्रगटला अशी त्याच्या उत्पत्तीची एक कहाणी प्रथम प्रसृत झाली. पुढे त्या कहाणीचेही नानाविध अवतार जगभरात पसरायला लागले. अमेरिकेविरुद्धच्या जैविक युद्धाचा एक भाग म्हणून चीननेच प्रयोगशाळेमध्ये या विषाणूची पद्धतशीरपणे निपज घडवून आणली, असाही एक श्लेष जनमानसात प्रस्थापित झाला. प्रथम कुतूहल, मग जिज्ञासा, पुढे भयशंका, त्या नंतर भीती आणि आता दहशत असे विविध टप्पे ओलांडत आपल्या जगण्याचा ताबा घेतलेल्या या 'कोरोना'च्या छायेत उभा जागतिक समुदाय जीव मुठीत धरून घराच्या चार भिंतींमध्ये स्वतःला कोंडून घेत आला दिवस घालवतो आहे. 'कोरोना'नामक या अनाहूत पाहुण्याची एवढी धास्ती प्रथम कोणालाच वाटत नव्हती. 'सार्स'सारखाच हाही आणखी एक विषाणू असेल आणि काही दिवसांनंतर येईल त्याची साथ आटोक्यात, असाच सगळ्यांचा कयास होता. परंतु, हे प्रकरण इतके साधे नाही, याचा अदमास आता सगळ्यांनाच येतो आहे. मुळात, या विषाणूची लागण आणि फैलाव होण्याचे माध्यमच तसे अ-साधारण आहे. गर्दी आणि निकट संपर्क यांच्या आधारे 'कोरोना' त्याचे हातपाय पसरतो, ही बाब वैशिष्ट्यपूर्ण होय. विशेषतः भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असणा-या आणि त्यांतही पुन्हा प्रचंड लोकसंख्येची घनताही तितकीच उदंड असणा-या देशामध्ये या विषाणूचा संसर्ग झपाट्याने विस्तारावा यांत अतर्क्य आणि अस्वाभाविक असे काहीच नाही.



या अक्रिताचा सामना करण्यात आजमितीला सर्वांत अधिक कसोटी लागते आहे ती आपल्या देशातील सार्वजनिक आरोग्य सेवेची आणि ती सेवा सर्वसामान्यांना पुरविणा-या यंत्रणेची. 'कोरोना'च्या रूपाने घोंघावणा-या अरिष्टाचा मुकाबला समर्थपणे करण्यास आजघडीला सार्वजनिक आरोग्य सेवा अपुरी ठरत असल्याचे आपण अनुभवतो आहोत. सर्वसामान्यांच्या दृष्टीने कळीच्या ठरणा-या सार्वजनिक आरोग्य सेवेच्या सक्षमीकरणाची नितांत गरज तपशीलवार सादर करणारा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नीळकंठ रथ यांचा लेख प्रस्तुत अंकात आवर्जून सादर करण्यामागील मुख्य हेतू तोच. या मुद्याबाबत व्यापक स्तरावर चर्चा आणि विचारविनिमय होणे आजघडीला नितांत निकडीचे असल्यामुळेच, 'पुरवणी' या सदरातील लेख अंकाच्या अखेरीस सादर करण्याचा एरवीचा पायंडा मोडून हा लेख 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात अगदी सुरुवातीलाच घेतलेला आहे. ■■

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

पुरवणी

# सार्वजनिक आरोग्य व्यवस्था

## 'कोविड'ने शिकविलेला धडा

■ डॉ. नीळकंठ रथ

'कोविड १९' या विषाणूच्या प्रादुर्भावाने आपल्या सगळ्यांनाच एक महत्त्वाचा धडा शिकविलेला आहे. वास्तविक पाहता हा धडा आपण अगोदरच गिरवायला हवा होता. या धड्याचा संबंध आहे तो आपल्या देशातील सार्वजनिक आरोग्यविषयक व्यवस्थेशी, तिच्या वाढविस्ताराशी, रचनेशी आणि कार्यपद्धतीशीही. 'कोविड १९'चा संसर्ग झालेली अथवा तशी प्राथमिक लक्षणे आढळून येणारी एखादी व्यक्ती कुटुंबात आहे किंवा कसे याची चौकशी करण्यासाठी घरोघरी भेट देण्याकरिता तरूण महिला व पुरूष उमेदवारांची भरती करण्यासंदर्भात राज्य सरकारे अलीकडे जाहिराती प्रकाशित करत असल्याचे आपण बघतो आहोत. हे काम चालणार आहे केवळ दोनच महिने. आता, एवढ्या मोठ्या देशात घरोघर जाऊन ही चौकशी करण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण लाभलेले तरूण पुरूष व महिला उमेदवार आपल्याला एवढ्या मोठ्या संख्येने कोठून व कसे मिळणार आहेत...आणि तेही जास्तीतजास्त केवळ दोनच महिन्यांच्या उमेदवारीसाठी ! आपल्या देशातील प्रत्येक खेड्यापाड्यात आणि शहरांमधील प्रभागा-प्रभागांत प्राथमिक आरोग्य केंद्रांची यंत्रणा आपण या पूर्वीच कार्यरत बनविली असती तर आज आली तशी आणि तेवढी बिकट व हातघाईची परिस्थिती आपल्यावर ओढवते ना. अशा प्रकारची यंत्रणा या आधीच कार्यान्वित केली गेली असती तर 'कोविड १९'च्या आजच्या फैलावासारख्या घडीलाच केवळ नव्हे तर एरवीही ती आपल्या कामाला आली असती. पूर्वापार येणा-या साथीच्या रोगांप्रमाणेच 'कोरोना'सारख्या नवनवीन विषाणूंच्या प्रादुर्भावापायी उद्भवणा-या परिस्थितीला सामोरे जाण्यास आपल्याला



त्यांमुळे अधिकच मदत झाली असती. अधूनमधून उद्भवणा-या किरकोळ आजारपणांदरम्यान उपचारांसाठी नजिकच्याच शासकीय दवाखान्यामध्ये जाण्याची सवय लोकांच्या अंगवळणी पडली असती तर परिसरातील सरकारी दवाखान्यांची यंत्रणा आणि तिथे काम करणारा वैद्यकीय कर्मचारी वर्ग यांच्याबद्दल सर्वसामान्यांच्या मनात विश्वासाची भावना निर्माण होण्यास त्यांमुळे आपसूकच हातभार लागला असता. विषाणूच्या साथीचा आजच्यासारखा फेरा आल्यानंतर वैद्यकीय मदतीसाठी आज सर्वसामान्यांची जी धावाधाव आणि शोधाशोध चाललेली आपण अनुभवतो आहोत ते चित्र त्यांमुळे दिसले नसते. किंबहुना, आर्थिकदृष्ट्या दुर्बल स्तरांत मोडणा-या कुटुंबांची संख्या व प्रमाण एकूणांत मोठे असणा-या आपल्यासारख्या देशात तर अशा धर्तीच्या वैद्यकीय सेवाव्यवस्थेची नितांत निकड भासते व आहेही. अशा सगळ्या समाजघटकांना वैद्यकीय उपचारांसाठी खासगी वैद्यकीय व्यावसायिकांकडे पावले वळविण्यास भाग पाडणे हे केवळ अव्यावहारिकच नव्हे तर तत्वशःदेखील अनुचितच होय. एकूणांतील मोठ्या लोकसंख्येची सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती त्या मानाने खूपच चांगली असलेल्या देशांमध्येही सर्वत्र कार्यरत असलेली सार्वजनिक आरोग्य व्यवस्था तत्पर असल्याची कित्येक उदाहरणे आज दाखविता येतात. वैद्यकीय सेवा आणि आरोग्यविषयक विम्यासारख्या संरक्षक कवचांसाठी अशा देशांमधील समाजघटक खासगी क्षेत्रावर अवलंबून असल्याचे चित्र तिथे दिसत नाही.

परंतु, वैद्यकीय सेवेसाठी खासगी क्षेत्रावरच निर्भर राहण्याकडे आपल्या देशातील वैद्यकीय सेवाविषयक धोरणांचा कल मात्र अलीकडील काळात झुकताना दिसतो. परिणामी, 'कोरोना'सारख्या विषाणूच्या साथीपायी आजच्यासारखी परिस्थिती उद्भवली की तिच्यातून भरडून निघण्याचे भागधेय आपल्या वाट्याला आलेले आहे. हे चित्र बदलणे आपल्याच हातात आहे - कार्यक्षम सार्वजनिक आरोग्य सेवा पुरविण्याची हमी देणा-या पक्षाच्याच हाती सत्तेची सूत्रे सोपविणे. आपल्या देशातील राजकीय व्यवस्थेमध्ये आजमितीस सक्रिय असणा-या पक्षांपैकी कोणीही, समजा, या कामाबाबत बांधिलकी दाखविण्यास राजी नसेल तर, सार्वजनिक आरोग्य सेवेचे सक्षमीकरण घडवून आणण्यास कटिबद्ध असणारा नवीन राजकीय पक्ष

निर्माण करणे अथवा त्या दिशेने संघटनात्मक प्रयत्न करणे गरजेचे ठरेल. आपले आजचे धोरणकर्ते समाजातील केवळ 'आहे रे' वर्गाचेच प्रतिनिधित्व करत आहेत अथवा करताना दिसतात. 'आहे रे' गटात समावेश नसलेले बाकी सारे निद्राधीन झालेले आहेत. झोपी गेलेल्यांच्या पदरात कधीच काहीच पडत नसते.

'काय करायला हवे...?' किंबहुना, 'काय करायला हवे होते...?' हे प्रश्न अशा सगळ्या परिस्थितीमध्ये पुढ्यात उभे ठाकतात. आपण अगदी तळापासूनच सुरुवात करू. सार्वजनिक वैद्यकीय सेवेसंदर्भात आपल्या देशातील धोरणामध्ये नमूद प्रचलीत मानकांनुसार दर तीन हजार लोकसंख्येमागे एक प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असावयास हवे. त्याचप्रमाणे, एक परिचारिका आणि वैद्यकीय पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेला एक डॉक्टर या दोन व्यक्ती प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नियुक्त असावयास हव्यात. प्राथमिक आरोग्य केंद्रांची स्वच्छता-साफसफाई राखणारे तसेच प्रसुतीदरम्यान लागणारी मदत पुरविणारे मनुष्यबळ तर वेगळेच. महाराष्ट्राची आजची लोकसंख्या जवळपास १२ कोटींच्या घरात भरते. ही लोकसंख्या लक्षात घेता, राज्यातील सर्व खेडी व शहरे मिळून आजघडीला गरज आहे जवळजवळ ४० हजार प्राथमिक आरोग्य केंद्रांची. परिचारिकेचा अगदी सुरुवातीचा मासिक पगार १२ हजार रुपये धरला तरी, संपूर्ण राज्यभरातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील परिचारिकांच्या पगारापोटी आपल्याला वार्षिक गरज आहे ५७६ कोटी रुपयांची. परस्परांच्या निकट असलेल्या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी मिळून एक डॉक्टर तरी हवाच. प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये तो अर्धा-अर्धा दिवस कार्यरत असेल, असे आपण गृहीत धरू. एम. बी. बी. एस झालेल्या डॉक्टरला दर महिना ५० हजार रुपये पगार या हिशेबाने २० हजार प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी राज्यभरातील डॉक्टरांच्या पगारापोटी वर्षाला १२०० कोटी रुपये आपल्याला लागतील. परिचारिका आणि डॉक्टर या दोघांच्या वेतनापायी दरवर्षी कराव्या लागणा-या या खर्चाची रक्कम भरते १७७६ कोटी रुपये इतकी. उपचारांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्राकडे धाव घेणा-या प्रत्येक रुग्णाकडून दरवेळी १० रुपये इतका आकार घेतला जाईल, असे आपण गृहीत मनाशी



धरू. दर प्राथमिक आरोग्य केंद्राला दर महिन्याला सरासरी ३०० रुग्ण भेट देतात असे गृहीत धरले तर, राज्यभरातील ४० हजार प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये दरवर्षाला जमा होणा-या वैद्यकीय शुल्काची रक्कम भरते ४४ कोटी रुपये इतकी. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामधील एक परिचारिका आणि एक डॉक्टर यांच्या पगाराचा वार्षिक खर्च आणि रुग्णांकडून वैद्यकीय शुल्काच्या रुपाने जमा होणारी रक्कम या दोहोंतील फरक येतो वर्षाला १६३२ कोटी रुपये असा. म्हणजेच, वर्षाला राज्यशासनाला नक्त १६३२ रुपये त्याच्या तिजोरीमधून खर्च करावे लागतील. सन २०२०-२१ या चालू वित्तीय वर्षासाठी राज्य सरकारच्या आरोग्य आणि कुटुंबनियोजन विभागाचे अंदाजपत्रक आहे १६ हजार कोटी रुपयांचे. म्हणजेच, प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रातील एक परिचारिका व एक डॉक्टर यांच्या पगारापोटी राज्य शासनाच्या तिजोरीवर पडणा-या वार्षिक नक्त १६३२ कोटी रुपयांचे राज्याच्या आरोग्य विभागाच्या वार्षिक अंदाजपत्रकाशी गुणोत्तर प्रमाण काढले तर ते भरते केवळ दहा टक्के इतके. (लोकसंख्या आणि आरोग्य विभागासाठीचे वार्षिक अंदाजपत्रक हे दोन्हीही महाराष्ट्रापेक्षा कमी असणा-या ओडिशा या राज्यामध्ये अशाच प्रकारची व्यवस्था राबविली गेली तर, ओडिशाच्या तिजोरीवर त्यांपायी पडणा-या अतिरिक्त नक्त बोज्याचे प्रमाणही त्या राज्याच्या आरोग्य विभागाच्या विद्यमान अंदाजपत्रकाच्या दहा टक्के इतकेच दिसते). प्राथमिक आरोग्य केंद्राशी संलग्न किमान मनुष्यबळाचाच काय तो खर्च या ठिकाणी आपण विचारात घेतलेला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत, ती बांधण्याचा भांडवली खर्च अथवा ती भाड्याने घेतली तर वर्षाकाठी अदा करावे लागणारे शुल्क, औषधखरेदीसाठी लागणारा पैसा, अन्य आनुषंगिक खर्च यांचाही हिशेब मांडणे गरजेचे ठरते. परंतु, या खर्चाचा अंदाज बांधणे मला तरी इथे शक्य नाही.

मात्र, या संदर्भातील एक बाब सुरुवातीलाच नोंदवून ठेवणे मला इष्ट वाटते. रोजच्या व्यवहारात उद्भवणा-या नेहेमीच्या आजारांसाठी उपयोगी ठरणारी, तुलनेने फार महाग नसणारी अशीच औषधे शासनसंस्थेने उपलब्ध करून द्यावीत. अधिक महाग आणि काही आजारांवरील खास औषधे मात्र त्या त्या रुग्णाने त्याची त्याची खरेदी करावीत. या संदर्भात कैक वर्षांपूर्वीचा

एक अनुभव अजूनही माझ्या स्मरणात आहे. एम. बी. बी. एस.ची पदवी प्राप्त करून घेतलेल्या पुण्यातील एका तरूण डॉक्टरची, तत्कालीन शासकीय नियमांना अनुसरून, प्रशिक्षणार्थी डॉक्टर म्हणून ग्रामीण भागातील एका प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सहा महिन्यांसाठी नियुक्ती करण्यात आलेली होती. त्याच्या उमेदवारीचा कार्यकाल संपण्याच्या सुमारास, एके दिवशी, तो डॉक्टर त्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील संबंधित दस्तऐवज घेऊन बसला आणि शासनातर्फे प्राथमिक आरोग्य केंद्राला पुरवठा करण्यात आलेल्या औषधांचा खर्च तो मांडून पाहू लागला. त्या वेळी त्याच्या ध्यानात एक मोठी रोचक बाब आली. ती अशी की, दररोजच्या जगण्यात उद्भवणा-या नेहेमीच्या किरकोळ आजारांवर उपयुक्त ठरणा-या वाजवी किमतींच्या औषधांचा वर्षभरासाठीचा साठा केवळ तीनएक महिन्यांच्या काळातच संपून जात असे. साहजिकच, अशी औषधे मग संबंधित रुग्णांना बाहेरून खरेदी करणे भाग पडे. प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांचाही नाइलाज असे. परंतु, अधुनमधूनच केवळ उद्भवणा-या रोगांवरील खास व महागड्या औषधांचा शासनाकडून केला जाणारा पुरवठा मात्र वर्षाचा काळ उलटून गेला तरी पडून राहत असे. प्राथमिक आरोग्य केंद्रांना पुरवठा केल्या जाणा-या औषधांच्या आकृतिबंधासंदर्भातील हे वास्तव अनाकलनीय असेच होते. नेहेमीच्या आजारपणांवर लागू पडणा-या औषधांचा पुरवठा शासकीय आरोग्य यंत्रणेला करणा-या पुरवठादारांना अशा औषधांच्या पुरवठ्यादाखल संबंधित यंत्रणेच्या हातावर मलई टिकवणे शक्य होत नसावे. मात्र, अधिक महाग औषधांमध्ये तशा व्यवहारांना वाव असल्यामुळेच तो सारा प्रकार घडत असावा, असा कयास मी ते सगळे ऐकले तेव्हा बांधला.

अनेक वर्षांपूर्वी तेव्हा मला ज्ञात झालेला असा प्रकार महाराष्ट्रात आणि देशातील बव्हंश राज्यांत कदाचित आजही अव्याहत चालू असावा. वेळोवेळी उद्भवणा-या किरकोळ आजारांवर प्रभावी ठरणा-या वाजवी किमतींच्या औषधांचा वर्षभर पुरेल इतका साठा प्राथमिक आरोग्य केंद्रांना पुरविला जावा आणि काही विशेष आजारांवरील महागडी अशी खास औषधे मात्र संबंधित रुग्णांनी गरजेनुसार त्यांची त्यांनी खरेदी करावीत, अशा प्रकारचे औषधखरेदीविषयक धोरण या संदर्भात अंमलात आणले



जाणे अगत्याचे ठरते. आजघडीला महाराष्ट्रामध्ये २०१२ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत. साहजिकच, प्रचलीत मानकांनुसार ३८ हजार अधिक प्राथमिक आरोग्य केंद्रे आपल्याला निर्माण करणे भाग आहे. यापायी १६ हजार ८७२ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च येईल. प्राथमिक आरोग्य केंद्रांमधून उपचार घेणा-या रुग्णांकडून भरणा झालेल्या वैद्यकीय शुल्क ध्यानात घेता हा हिशेब १५ हजार ४३२ कोटी इतक्या नक्त रकमेचा भरतो. यांत अधिक भर पडेल ती औषधखरेदी तसेच अन्य आनुषंगिक बाबींसाठी कराव्या लागणा-या तरतुदीची. प्रसूतीसाठी प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये किमान दोनएक वेगळ्या स्वतंत्र खोल्या, त्यासाठी आवश्यक असणारी उपकरणे, औषधे आणि कर्मचारी वर्ग आवश्यक ठरतो. स्थानिक परिसरातील 'आशा' कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका प्राथमिक आरोग्य केंद्राशी संलग्न करून घेतल्या जाणे आवश्यक व उपयुक्त ठरते.

हे सगळे विवेचन झाले ते अगदी तळाच्या स्तरावरील आरोग्य सेवा व व्यवस्थेसंदर्भातील. आजमितीस राज्यात एकंदर तालुके आहेत ३५५. शहरोशहरींचे प्रभाग वेगळेच. त्यांची गणना इथे केलेली नाही. तालुक्याच्या गावी तसेच शहरांतील प्रत्येक प्रभागात १०० खाटांचे एकेक इस्पितळ असावयास हवे. प्रसुतीची सुविधाही अशा रुग्णालयांमधून पुरविली गेली पाहिजे. तज्ज्ञ आणि विशेषज्ञ डॉक्टर, परिचारिका, अन्य आनुषंगिक कर्मचारी, उपकरणे, क्ष-किरण यंत्रे यांसारख्या सोयीसुविधांनी अशी इस्पितळे सुसज्ज असायला हवीत. परिसरातील गरजवंत रुग्णांना इस्पितळापर्यंत घेऊन येण्यासाठी रुग्णवाहिकांची उपलब्धताही तिथे असावयास हवी. प्रसुतीची सुविधा आणि ५०० खाटांची क्षमता असणारे एकेक रुग्णालय प्रत्येक जिल्ह्याच्या गावी उभारले गेले पाहिजे. तज्ज्ञ विशेषज्ञ, प्रशिक्षित परिचारिका व अन्य कर्मचारी, उपकरणे, रुग्णवाहिका, सोयीसुविधा, शस्त्रक्रियेसाठी सुसज्ज दालने यांसारख्या बाबी तिथे तैनात असावयास हव्यात. आजघडीला राज्यामध्ये एकंदर ३६ जिल्हे आहेत. या प्रत्येक जिल्ह्यामध्ये असे रुग्णालय उभारले गेले पाहिजे. आज कार्यरत असलेल्या जिल्हा रुग्णालयांचे आवश्यक ते सक्षमीकरण घडवून आणत नमूद

केल्याप्रमाणे तिथे खाटांची संख्या वाढविणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये कार्यरत असणारी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था तसेच खेडोपाडीची प्राथमिक आरोग्य केंद्रे यांनी शिफारस करून उपचारांसाठी धाडलेले रुग्ण जिल्हा रुग्णालयांकडे येऊ शकतील. जिल्हा पातळीवर कार्यरत असणाऱ्या अशा रुग्णालयांमधून परिचारिकांच्या प्रशिक्षणाचीही सुविधा कार्यान्वित केली जाणे अगत्याचे ठरते. कारण, 'कोविड १९'सारख्या विषाणूच्या साथीदरम्यान प्रशिक्षित परिचारिकांची गरज मोठ्या संख्येने भासणार आहे. सरकारी तसेच खासगी वैद्यकीय महाविद्यालये तथा अत्यंत विशेष प्रकारचे खास उपचार करणारी उपचार केंद्रे यांची व्यवस्था वेगळी. तिचा विचार या ठिकाणी प्रस्तुत नाही. सार्वजनिक आरोग्यासंदर्भात आज ज्या प्रकारच्या आव्हानाला आपण तोंड देत आहोत तशा आव्हानांप्रमाणेच एरवीही लागणारी किरकोळ रुग्णसेवा गरजूंना पुरविण्यात ही सारी व्यवस्था कामी येईल.

राज्याच्या एकंदर खर्चापैकी जवळपास चार टक्के इतका खर्च आजघडीला आरोग्यसेवांवर केला जातो. इथवर विवरण केल्याप्रमाणे राज्यातील सार्वजनिक आरोग्य यंत्रणा कार्यरत बनवायची म्हणले तर आजच्या दुप्पट म्हणजे साधारणतः राज्याच्या एकंदर वार्षिक खर्चापैकी आठएक टक्के इतका खर्च आरोग्याकडे वळवावा लागेल. एकीकडे शालेय शिक्षणापोटी जवळपास इतकाच खर्च होत असताना आरोग्यसेवेसाठी तेवढीच तरतूद केली जावी, अशी अपेक्षा धरणे अनाठायी, अवाजवी म्हणता येईल का ?

सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा भाग असलेल्या रुग्णालयांचे नियंत्रण व व्यवस्थापन हा या संदर्भातील एक कळीचा मुद्दा शाबीत होतो. आजची व्यवस्था अशी आहे की, या संदर्भात निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करते ते राज्य सरकारच. १९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली त्या वेळी तत्कालीन राज्य सरकारने जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीच्या स्थापनेसाठी कायदा मंजूर केला. राज्याच्या तत्कालीन अंदाजपत्रकापैकी जवळपास ४० टक्के रक्कम एकगठ्ठा जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित केली गेली. त्यांच्या त्यांच्या परिसरातील



आवश्यक त्या कामांसाठी तसेच विकासोपक्रमांसाठी जिल्हा परिषदांनी त्या रकमेचा विनियोग करावा, अशी अपेक्षा व ती व्यवस्था होती. भारतीय राज्यघटनेमध्ये अंतर्भूत करण्यात आलेल्या ७३व्या घटनादुरुस्तीद्वारे तशीच व्यवस्था देशभरात अस्तित्त्वात आली. जिल्ह्याजिल्ह्यांत कार्यरत असणारे राज्य सरकारी कर्मचारी जिल्हा परिषदेचे कर्मचारी म्हणून त्या त्या जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत नियुक्त केले गेले. जिल्ह्यातील विविध संस्थांमध्ये भरती करावयाच्या कर्मचाऱ्यांची निवड करण्यासाठी वेगळे निवड मंडळ स्थापन करण्यात आलेले होते. साहजिकच, एका जिल्ह्यामधून दुसऱ्या जिल्ह्यामध्ये कर्मचाऱ्यांची बदली वगैरे होण्याचा अथवा केली जाण्याचा प्रश्नच उरला नाही. जिल्ह्यातील रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी जिल्हा प्रशासनाकडे होती व असे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या या प्रयोगाच्या अत्यंत यशस्वी अंमलबजावणीनंतर राज्य सरकारने एक कायदा मंजूर करून ती व्यवस्था बरखास्तच करून टाकली. जिल्ह्यासंदर्भात राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांची तामिली करणारी यंत्रणा एवढेच काय ते स्वरूप जिल्हा परिषदांना आज व्यवहारात प्राप्त झालेले आहे.

जिल्हाजिल्ह्यांतील विकास कामांसंदर्भातील निर्णयप्रक्रियेमधून तसेच त्या संदर्भात केल्या जाणाऱ्या कार्यवाहीमधून आपण वगळले गेल्याची अथवा जात असल्याची भावना आमदारांमध्ये दाटू लागल्यामुळे ते पाऊल उचलले गेले. राज्य विधानमंडळामध्ये कायदे मंजूर करणे तसेच शासनासाठी निधी उभारणे यांसारखी लोकप्रतिनिधींकडून स्वरूपतः अपेक्षित असणारी कामे तितकीशी महत्त्वाची नाहीत, अशी आमदारांची बनलेली धारणा याच्या मुळाशी होती अथवा असावी. जिल्हा परिषदांसंदर्भात राज्यात १९६१ साली अस्तित्त्वात आणला गेलेला तो कायदा पुनर्स्थापित करून या लेखामध्ये सुचविण्यात आलेली रुग्णालयांची व्यवस्था अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदांकडे सुपूर्त केली जाण्यास अधिक विलंब होता कामा नये. अशा प्रकारची विकेंद्रीत व्यवस्था आजमितीस केरळमध्ये कार्यरत आहे. 'कोविड १९'च्या फैलावापायी उद्‌भवलेल्या परिस्थितीचा सामना त्यांमुळेच तिथे अधिक चांगल्या प्रकारे करता आला. *(कृपया पृष्ठ क्रमांक २९ पाहावे)*

जैव-पर्यावरण

# प्रश्न...जैवविविधतेच्या अस्तित्वाचा

निसर्गामध्ये जैवविविधता प्रचंड आहे. परंतु, स्वतःच्या स्वार्थासाठी आणि प्रगतीच्या नावाखाली माणूस सातत्याने निसर्गामध्ये हस्तक्षेप करीत असतो आणि त्यातून निसर्गाचा व त्यातील जैवविविधतेचा सातत्याने ऱ्हास होत असतो. बेसुमार वृक्षतोड, जंगलांचा ऱ्हास, वनांमध्ये होत असलेले मानवी अतिक्रमण अशा अनेकानेक कारणांमुळे वन्यजीवांच्या जगण्यावरही विविध प्रकारचे आक्रमण होत राहते. माणसाच्या अशा हस्तक्षेपामुळेच निसर्गातील अनेक महत्त्वाच्या वन्यजीव प्रजाती नष्ट झालेल्या आहेत, तर अनेक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. अलीकडेच झालेल्या एका महत्त्वपूर्ण अशा संशोधनामुळे वन्यजीव जपणे किती गरजेचे आहे या मुद्याकडे लक्ष वेधले गेले आहे.

सृष्टीतील जैवविविधतेचे संतुलन हा पृथ्वीवरील सर्व सजीवांना आधार ठरणारा पाया समजला जातो. संपूर्ण मानवजातीची समृद्धी, उत्कर्ष यांच्यासाठी आणि मानवी समाज जिवंत राहून त्याची वाटचाल पुढे सुरू ठेवायची असेल तर जैवविविधतेचे संतुलन ही प्राथमिक गरज आहे. सद्यःस्थितीत आपल्याला ज्या ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते आहे त्यामागे, निसर्गाने जे जे मुक्त हस्ताने दिलेले आहे त्याचा बेसुमार आणि बेपर्वाईने होणारा वापर, हेच मुख्य कारण आहे. निसर्ग ओरबाडण्यासाठी नसून आपण निसर्गावर अवलंबून आहोत हे नीटपणे माणसाला उमगेल तेव्हाच खरे तर बदल घडून येतील. पृथ्वीच्या आजवरच्या इतिहासात जेव्हापासून मानवी हस्तक्षेप अधिक प्रमाणात वाढू लागला आहे तेव्हापासून विविध प्रजाती मृत होण्याचे प्रमाण पूर्वीपेक्षा १०० पटींनी किंवा त्यापेक्षाही अधिक पटीने वाढले असल्याचा वन्यजीव अभ्यासकांचा दावा आहे. त्यामुळेच, जैवविविधतेचा झपाट्याने होणारा ऱ्हास ही पृथ्वीच्या अस्तित्वाच्या दृष्टीने धोक्याची घंटा मानली जाते आहे.



विश्व वन्यजीव निधी (World Wildlife Fund) या संस्थेच्या माध्यमातून गेल्या ५० वर्षांतील वन्यजीवांच्या संख्येचा तुलनात्मक आढावा घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने Living Planet Index साकारण्यासाठी विविध पर्यावरणसंस्थांशी संबंधित ५० हून अधिक जाणकार, अभ्यासक व संशोधक यांनी यात महत्त्वपूर्ण असे योगदान दिलेले आहे. यातून पुढे येणारे निष्कर्ष डोळ्यांआड करता येण्याजोगे नव्हेत. गेल्या ५० वर्षांच्या कालावधीत पृथ्वीवरील एकूण वन्यजीवांच्या संख्येमध्ये दोन तृतीयांश इतकी लक्षणीय घट झाली असल्याची माहिती या अभ्यासाद्वारे समोर आलेली आहे. माणसांकडून होत असणारा निसर्गाचा ऱ्हास आणि निसर्गात निष्कारण केला जाणारा हस्तक्षेप यास कारणीभूत असल्याचे निरीक्षण अभ्यासकांनी मांडलेले आहे.

या संशोधनामध्ये १९७० ते २०१६ या कालावधीतील जिवंत असणाऱ्या वन्यजीवांचा अभ्यास करण्यात आला आहे. वन्यजीवांची ही संख्यात्मक घट अतिशय घातक असल्याने पर्यावरणीय समतोल ढासळतो आहे. पर्यावरणाचा पूर्वी कधीही नव्हता इतका प्रचंड ऱ्हास माणसाने या गेल्या अर्धशतकी कालखंडात घडवून आणल्याने त्याचेच हे फलित आहे, अशा शब्दांत या अभ्यास अहवालामध्ये टीका करण्यात आली आहे. त्याचबरोबर, ही परिस्थिती आता तरी सुधारावी म्हणून तातडीने पावले उचलणे आणि अधिकाधिक प्रमाणात जैवविविधतेचे रक्षण करणे गरजेचे असल्याचे आग्रहाने प्रतिपादन करण्यात आले आहे.

प्रस्तुत अभ्यासानुसार, गेल्या ५० वर्षांत सुमारे २० हजारांहून अधिक सस्तन प्राणी, पक्षी, उभयचर, सरपटणारे प्राणी व मासे यांच्या प्रजातींमध्ये घट झाल्याचे वास्तव नोंदवण्यात आलेले आहे. गेल्या ५० वर्षांत विविध प्रकारच्या प्रजातींमध्ये ६० टक्के घट झाली आहे. जंगलांमध्ये आगी लागतात अथवा लावल्या जातात, समुद्रात विविध प्रकारचा कचरा मिसळला जातो किंवा भराव घातला जातो, अनेकदा जंगलांमध्ये अतिक्रमण करून तो भूभाग व्यापला जातो त्यामुळे तेथील वन्यजीवांना विस्थापित होऊन अन्य ठिकाणी आसरे शोधावे लागतात. या सगळ्याचे परिणाम अंतिमतः माणसाला भोगावेच लागणार आहेत. निसर्ग आपल्याला वेळोवेळी

सावध करीत असतो. परंतु, माणूस मात्र बेपर्वाईने निसर्गाचा -हास होऊ देतो आणि त्यातून स्वतःचे आरोग्य, सुरक्षा आणि अस्तित्वच धोक्यात आणतो आहे, अशी भूमिका विश्व वन्यजीव निधीचे संचालक Marco Lambertini यांनी प्रस्तुत अभ्यासात मांडलेली आहे.

वस्तुतः आजच्या घडीला जे जे काही मानवनिर्मित आहे ती सारी निसर्गाची देन आहे. निसर्गात काहीही निरर्थक नाही. प्रत्येक गोष्टीला महत्त्व आहे. माणूस हा निसर्गाचा अविभाज्य घटक असल्याकारणाने मानवी जीवनावरही त्यातील अनेक गोष्टींचा कळत-नकळतपणे परिणाम होत असतो. जमिनींचे होणारे रूपांतरण. कृषी क्षेत्राची घटती जागा आणि प्रजातींमध्ये होणारे बदल या सगळ्याला माणूसच कारणीभूत आहे. एका संशोधनात असेही आढळून आले आहे की, या पृथ्वीवरील केवळ एक चतुर्थांश इतकी जमीन आता रिकामी राहिलेली आहे आणि २०५० सालापर्यंत केवळ एक दशांश इतकीच जागा मानववंशासाठी उरलेली असेल. जमिनीची उपलब्धता कमी होण्यामागे जंगलांचा -हासही कारणीभूत आहे. त्याचे दूरगामी परिणाम जंगलातील विविध प्रजातींवर होतात. अधिवासाच्या जागा बदलत राहिल्याने पशुपक्ष्यांच्या प्रजननक्षमतेवरही परिणाम होतो. परिणामी, जैवविविधतेचे संतुलनही ढासळू लागते. मानवी हस्तक्षेपामुळे समुद्रातील जलचर तसेच अगदी नदी-तलावातील जलचरांच्याही पर्यावरणीय व्यवस्थेत अनेकानेक बदल झालेले आहेत आणि त्यामुळे त्यांचेही अस्तित्व संकटात सापडले आहे.

१९५० सालापासून शिकारींद्वारे समुद्रातून काढलेल्या जलचरांची संख्या ६० अब्ज इतकी प्रचंड आहे. ती दररोज वाढतेच आहे. समुद्रांमध्ये प्रचंड प्रमाणात पसरलेल्या प्लॅस्टिक कच-यामुळे तर अगणित जलचरांचा प्राण घुसमटतो आहे. स्वच्छ पाणी देणा-या नद्या, तलाव, झरे हे अतिशय उपयुक्त असे जलस्रोत निसर्गाने दिलेले असताना तिथेही माणसाने अतिशय गंभीर परिस्थिती निर्माण करून ठेवली असल्याचे निरीक्षण या अभ्यासात नोंदवण्यात आलेले आहे. उष्ण कटिबंधीय भागांमध्ये राहणा-या वन्यजीवांच्या संख्येत लक्षणीय घट होते आहे. लॅटिन अमेरिका आणि कॅरेबियन बेटांवरील वन्यजीवांच्या संख्येत ९४ टक्के घट झालेली आहे. दक्षिण आणि मध्य



अमेरिकेमध्ये मोठ्या प्रमाणावर वन्यजीव प्रजाती घटल्याचे दिसून आले आहे. १९७० सालापासून आत्तापर्यंत ८९ टक्के इतकी मोठी घट प्रजातींमध्ये घडून आलेली आहे. त्याचप्रमाणे, स्वच्छ पाण्याचे जे नैसर्गिक स्रोत असतात तेथील जलचरांच्याही संख्येत घसरण झाली असून १९७० सालापासून त्यात ८३ टक्के इतकी घट झालेली आहे. ही सगळी आकडेवारी लक्षात घेता, जैवविविधता जपणे, प्रजातींचा -हास रोखणे आणि पर्यावरणीय संतुलन जपणे हे तिहेरी आव्हान आपल्या पुढ्यात उभे ठाकल्याचे या अहवालाने सूचित केलेल्या भविष्यातील धोक्यावरून लक्षात येते.

विविध प्रजातींच्या संख्येत होणारी घट अथवा वाढ यांचाही अचूक अंदाज या संख्यात्मक आलेखातून येतो. त्याच बरोबर, जगभरातील विविध भौगोलिक परिस्थितींमध्ये असणा-या जैवविविधतेमध्ये कोणकोणता फरक पडतो आहे आणि त्या मागील कारणे कोणती आहेत याचे आकलन नेमकेपणाने होण्यासाठी Living Planet Index च्या माध्यमातून समोर उभे राहणारे चित्र निश्चितच उपयुक्त ठरणारे आहे. हे आकलन होत असतानाच विविध वातावरणांत वास्तव्य करणा-या एकाच स्वरूपाच्या प्रजातींवर त्या त्या भौगोलिक वातावरणाचा काही परिणाम होतो का याचाही अंदाज येऊ शकणार आहे. एकीकडे जागतिक तापमानवाढीचे आव्हान असताना त्याचाही प्रतिकूल परिणाम जैवविविधतेच्या संपन्नतेवर कसा होतो आहे याचाही अंदाज येऊ शकणार आहे.

या सृष्टीतील जैवविविधतेचे संरक्षण, संवर्धन करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची नितांत गरज आजघडीला निर्माण झालेली आहे. त्या पार्श्वभूमीवर, विश्व वन्यजीव निधीने यासाठी पुढाकार घेत जगभरातील सुमारे ४० विद्यापीठे आणि पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या सामाजिक संस्था यांना एकत्रित केले आहे. जैवविविधतेचा -हास रोखण्यासाठी आणि पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी जागतिक स्तरावर जी पावले उचलणे आवश्यक आहे त्यासाठी हे सारे एकत्रितपणे प्रयत्न करणार आहेत. मात्र आव्हानाची व्यापकता लक्षात घेता एवढेच पुरेसे ठरणार नसून, सर्व प्राणिप्रेमी, वन्यप्रेमी आणि पर्यावरणतज्ज्ञांनी एकत्रित येऊन प्रयत्न करणे हीच काळाची खरी गरज आहे. ■■

पर्यावरण

# हिमनद्या धोक्यात

पृथ्वीवरचे नंदनवन म्हणून जम्मू-काश्मीरची ओळख सर्वदूर आहे. तेथील बर्फाच्छादित अशा हिमालयाच्या पर्वतरांगा हे जगभरातील पर्यटकांचे आकर्षण आहे. परंतु गेल्या काही वर्षांपासून या नंदनवनालाही हवामानबदलाचे चटके बसू लागले आहेत. अलीकडेच झालेल्या एका महत्त्वाच्या संशोधनानुसार, २१ व्या शतकाच्या अखेरपर्यंत जम्मू-काश्मीरमधील सरासरी तापमान सात डिग्री सेल्सिअसने वाढण्याचा अंदाज आहे. त्यामुळे तेथील अनेक हिमनद्या वेगाने वितळू लागल्या आहेत. पर्यावरणाच्या दृष्टीने ही धोक्याची घंटा मानली जात असून जगभरातील पर्यावरणतज्ज्ञांचे लक्ष आता तिकडे वेधले गेलेले आहे.

श्रीनगरच्या काश्मीर विद्यापीठातील संशोधन अधिष्ठाता प्रा. शकील अहमद रोमेंशू यांच्या नेतृत्वाखाली संशोधकांच्या चमूने मिळून 'हवामान बदलाचा जम्मू, काश्मीर आणि लडाखवर होणारा परिणाम' या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला आहे. हिमालयीन प्रदेशांतील हिमनद्यांच्या वितळण्यासंबंधातील हा अभ्यास महत्त्वाचा असून उपलब्ध असणाऱ्या उपग्रहीय माहितीचीही मदत त्यासाठी घेण्यात आली आहे. जम्मू, काश्मीर, लडाख, गिलगिट-बाल्टिस्तान, अक्साई चीन आणि देशाच्या सीमेवरील नियंत्रण रेषेच्या जवळच्या सर्व भागाचा अभ्यास यात करण्यात आलेला आहे. Journal of Scientific Reports या आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये हा अभ्यास प्रकाशित झालेला आहे. हिमनद्यांचा एकत्रितपणे अभ्यास पहिल्यांदाच झाला असल्याचा संशोधकांचा दावा आहे त्यामुळे, एकूणच जागतिक हवामानबदलाचा अभ्यास सुरू असताना या नव्या अभ्यासातून समोर येत असलेली माहिती महत्त्वाची मानली जाते आहे.

हवामान बदलाचे अनेकानेक परिणाम सर्वत्र होत आहेत. याचाच एक भाग म्हणून जम्मू, काश्मीर आणि लडाखमधील एकूण सरासरी



तापमान चालू शतकाच्या अखेरपर्यंत ६.९ डिग्री सेल्सिअसने वाढणार असल्याचा अंदाज या अभ्यासाद्वारे वर्तवण्यात आलेला आहे. हा अंदाज खरा ठरला तर हिमालयातील तब्बल ८५ टक्के हिमनद्यांचे अस्तित्व धोक्यामध्ये येईल.

या अभ्यासातून वेगवेगळे अंदाज वर्तवण्यात आलेले आहेत. त्यानुसार, सन २००० ते २०१२ या बारा वर्षांच्या कालावधीमध्ये सुमारे १२०० हिमनद्यांच्या वस्तुमानात वार्षिक ३५ सेंटिमीटर इतकी घट झालेली आहे. संपूर्ण दशकाचा विचार केला, तर हिमनद्यांच्या वस्तुमानातील एकूण घट ही ७०.३२ गिगाटन इतकी झालेली आहे. त्यामुळे, २१ व्या शतकाच्या अखेरपर्यंत या भागांतील तापमान सरासरीने चार ते सात डिग्री सेल्सिअस इतके वाढण्याचा अंदाज आहे. या शतकाच्या अखेरीस उर्वरित जगात आणि देशात जितकी तापमानवाढ होईल त्यापेक्षा अधिक तापमानवाढ ही जम्मू-काश्मीरमध्ये झालेली असेल, अशीही शक्यता हा अभ्यास वर्तवितो. अगदी वाईटात वाईट परिस्थिती गृहीत धरली तरी २१व्या शतकाच्या अखेरपर्यंत संपूर्ण जगातील सरासरी तापमानवाढ ही पाच डिग्री सेल्सिअस आणि भारतातील सरासरी तापमानवाढ ४.४ डिग्री सेल्सिअसच्या आसपास राहील असा हवामानतज्ज्ञांचा अंदाज आहे. परंतु, त्या तुलनेत जम्मू, काश्मीर व लडाखमधील तापमानवाढीचा दर मात्र निश्चितपणे अधिक असेल, असा अभ्यासकांचा दावा आहे.

प्रस्तुत संशोधनामुळे जी माहिती समोर आलेली आहे तिच्यानुसार, काराकोरम पर्वतरांगांपेक्षा पीर-पंजाल या भागातील हिमनद्या वितळण्याचा वेग अधिक असल्याचे दिसते आहे. काराकोरम येथील पर्वतरागांमध्ये बर्फ वितळण्याचा वेग वर्षाला दहा सेंटिमीटर इतका आहे. तर, तेच प्रमाण पीर-पंजाल येथे वर्षाला एक मीटर इतके अधिक आहे. काराकोरम पर्वतरांगांमधील बर्फ वितळण्याचा तुलनेने कमी असलेला दर लक्षात घेता तेथील हिमनद्या सुरक्षित राहू शकतील, असे या अभ्यासात नमूद केलेले आहे. हिमालयातील इतर पर्वतरांगांमधील आणि लेहमधील पर्वतरागांतील हिमनद्या वितळण्याचा वेग फार मोठा नसला तरीही भविष्यात त्यांनासुद्धा धोका निर्माण होऊ शकतो, असा अभ्यासकांचा अंदाज आहे.

जगभरात सुरू असलेला जीवाश्मयुक्त इंधनांचा बेसुमार वापर, प्रचंड प्रमाणात होणारी जंगलतोड, बर्फवृष्टीत झालेली घट, अनिर्बंध औद्योगीकरण, वाढते वायूप्रदूषण आणि इतर काही कारणांमुळे घडून येत असलेले हवामानातील बदल यामुळे जगभरात कार्बनचे उत्सर्जन वाढलेले आहे. जम्मू-काश्मीरमधील हिमनद्यांच्या संदर्भातदेखील जे बदल दिसून येत आहेत त्यालाही याच गोष्टी कारणीभूत आहेत, अशी भूमिका प्रा. शकील अहमद रोमेंशू यांनी मांडली आहे. जम्मू, काश्मीर आणि लडाख या हिमाच्छादित भागांमध्ये कुठेही औद्योगीकरण झालेले नाही. मात्र, असे असूनही तिथेसुद्धा हवामानबदलाचे जे ठळक आणि गंभीर परिणाम दिसून येत आहेत त्यातून जागतिक हवामान बदलासंदर्भातील गांभीर्य लक्षात येऊ शकते, या महत्त्वाच्या मुद्याकडे ते अभ्यासकांचे लक्ष वेधतात.

जम्मू-काश्मीरमधील पर्वतरांगा आणि तेथील हिमनद्यांचा तीन वेगवेगळ्या प्रकारच्या हवामानांत अभ्यास या प्रकल्पादरम्यान करण्यात आला. त्यावरून, बरीच नवीन माहिती हाती आलेली आहे. हवामानबदलांमुळे उष्ण कटिबंधातील आणि समशीतोष्ण भागातील क्षेत्रे आगामी काळामध्ये विस्तृत होत जातील आणि शीत हवामानाचे क्षेत्र मात्र आकुंचन पावेल, असे अभ्यासकांचे अनुमान आहे. लडाखमधील सर्वाधिक थंड हवामान असणारा भाग सर्वांत जास्त म्हणजे, २२ टक्क्यांनी आकुंचन पावेल असा अंदाज आहे. अन्य समशीतोष्ण आणि उष्ण कटिबंधातील भागांवर मात्र तितकेसे परिणाम होणार नाहीत. हे अपेक्षित लक्षणीय बदल २१ व्या शतकाच्या अखेरपर्यंत दिसू लागलेले असतील, असा संशोधकांचा अंदाज आहे. जम्मू-काश्मीरमधील अर्थकारणाशी निगडीत प्रत्येक क्षेत्रावर हवामानबदलाचे दूरगामी परिणाम होतील. हिमनद्या हा या भागातील सर्वांत महत्त्वाचा साधनस्रोत असल्याने त्यामध्ये होणा-या बदलांचे परिणाम स्वाभाविकपणे तेथील जनजीवनावरही झाल्याखेरीज राहणार नाहीत. दक्षिण आशियातील अनेक देशांमध्ये सिंधू खो-यातील पाणी सामाईकरीत्या वापरले जाते. त्यामुळे हिमनद्या आटल्यानंतर त्याचा परिणाम तिथेही होऊ शकेल, असे अभ्यासकांचे मत आहे. इतकेच काय, हवामान बदलांमुळे या भागांत उगवणा-या भाज्यांचे स्वरूपही बदलू शकेल. हिमवर्षावाचे वार्षिक



सरासरी प्रमाण बदलेल आणि या भागातील हिमनद्याही कमी होत जातील. जीव-जंतू आणि फुलांच्या जैवविविधतेही वाढ झाल्याचे दिसून येईल. शेतीमध्येही अनेक ठळक बदल होतील आणि विविध पिकांच्या उत्पादकतेतही बदल झालेले दिसून येतील. जल-विद्युत उत्पादनात घट होईल. पर्यावरणपूरक सेवांची मागणी कमी होईल आणि या भागात अर्थकारणाला गती देणा-या आर्थिक क्षेत्रांना मोठा फटका बसू शकेल, असा अभ्यासकांचा अंदाज आहे. त्यामुळे हवामानबदलाचे जम्मू-काश्मीर व लडाखवर होऊ शकणारे संभाव्य बदल आणि त्याचे सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक स्तरांवरचे संभाव्य परिणाम लक्षात घेऊन एक सुस्पष्ट धोरण आखणे गरजेचे आहे, असे प्रस्तुत अभ्यासात आग्रहाने नमूद करण्यात आले आहे. त्या दृष्टीने आजच पावले उचलावयास हवीत, असेही अभ्यासकांचे प्रतिपादन दिसते.

गेल्या दोन दशकांपासून जम्मू-काश्मीरमध्ये बदल दिसून येत आहेत. राजधानीचे शहर असलेल्या श्रीनगरमधील वाढते तापमान हासुद्धा स्थानिकांच्या आणि अभ्यासकांच्या चिंतेचा विषय बनलेला आहे. काश्मीरमधील पाण्याचा मुख्य स्रोत असणारी Kolhai ही हिमनदी वितळू लागल्याने दिवसेंदिवस पाण्याची टंचाई जाणवते आहे. गेल्या १०० वर्षांतील जागतिक तापमानवाढीचा सरासरी आढावा घेतला तर ०.८ ते ०.९ डिग्री सेल्सिअस एवढ्या प्रमाणात ती वाढ दिसते. त्या तुलनेत, जम्मू-काश्मीरमध्ये होत असलेली सरासरी तापमानवाढ १.२ डिग्री सेल्सिअस इतकी आहे. या भागांतील हिमनद्या वितळू लागणे हा हवामानबदलाचा दृश्य स्वरूपातील ठळक आणि गंभीर परिणाम असल्याचे हवामानतज्ज्ञ मानतात. श्रीनगरमधील पत्रकार काझी झैद यांनी हिमनद्यांच्या उपग्रहाद्वारे प्राप्त झालेल्या छायाचित्रांचा अभ्यास करून गेल्या ३० वर्षांतील बदलांचा आढावा घेतला. सिंधू नदीच्या पाण्याचा मुख्य स्रोत असणारी Shafat ही हिमनदी काही वर्षांपूर्वी पर्वतरांगांवर ठळकपणाने दिसून यायची. मात्र, आता १० ते १२ किलोमीटरच्या मोठ्या पट्ट्यामध्ये बर्फ कमी झाल्याचे उघडपणे दिसते, असे लक्षात आले. जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या ढगफुटीमुळे २०१४ साली आलेला प्रचंड पूर हेदेखील या बदलत्या पर्यावरण वास्तवाचे असेच बोलके उदाहरण. प्रस्तुत नव्या संशोधनामुळे या विषयाचे गांभीर्य पुन्हा अधोरेखित झालेले आहे. ■■

सामाजिक

# महिलांवरील अत्याचारांचे भीषण वास्तव

महिलांवर केले जाणारे लैंगिक अत्याचार किंवा महिलांचे होणारे लैंगिक शोषण ही केवळ भारतालाच नव्हे, तर जगभरातील बहुतांश देशांना भेडसावणारी एक गंभीर सामाजिक समस्या आहे. जगभरातील सुमारे ३५ टक्क्यांहून अधिक महिलांना आयुष्यात कधी ना कधी कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील लैंगिक शोषणाला अथवा अत्याचारांना सामोरे जावे लागलेले असते. एखादा देश प्रगत आहे की मागास यावर हे प्रमाण अवलंबून असल्याचे दिसत नाही, त्याचा संबंध मानसिकतेशी आहे, असे जागतिक आकडेवारीवरून निदर्शनास येते. जगातील प्रगत, विकसनशील आणि मागास अशा सर्वच देशांत लैंगिक अत्याचाराच्या घटना सातत्याने घडतात. अगदी जगाची महासत्ता म्हणून मिरवणा-या अमेरिकेतसुद्धा प्रत्येकी पाचपैकी एका स्त्रीला बलात्कारासारख्या हीन प्रसंगाला आयुष्यात कोणत्या तरी टप्प्यावर सामोरे जावे लागते, असे या संदर्भातील एका अभ्यासाचा निष्कर्ष सांगतो. ('बलात्कार' या शब्दाऐवजी इथून पुढे संपूर्ण लेखामध्ये 'लैंगिक बळजबरी' अशी शब्दयोजना केलेली आहे).

अमेरिकेतही लैंगिक बळजबरीच्या घटनांचे प्रमाण मोठे आहे. १९९० ते २०१८ या सालांतील अमेरिकेतील गुन्ह्यांची आकडेवारी पाहिली असता, लैंगिक बळजबरीच्या एक लाखांहून अधिक घटना दरवर्षी पोलिसांकडे अधिकृतपणे नोंदवल्या गेलेल्या दिसतात. दुस-या बाजूला, आर्थिकदृष्ट्या फारशा विकसित नसलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या अनेक भागांतही लैंगिक अत्याचारांचे प्रमाण मोठे आहे. दक्षिण आफ्रिकेमध्ये २०१९-२० या एका वर्षांत लैंगिक अत्याचाराच्या ५३ हजारांहून अधिक घटना नोंदवलेल्या आहेत. त्यात बहुसंख्य घटना या लैंगिक बळजबरीच्याच आहेत. २०१८-१९ या त्या आधीच्या वर्षाच्या तुलनेत लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली असल्याचेही ही आकडेवारी दर्शवते. त्यामुळे लैंगिक बळजबरीच्या प्रकरणांकडे पाहत असताना भौतिक विकास आणि आर्थिक प्रगती किती



आणि कशी झाली आहे यापेक्षाही संबंधित घटनांचा संबंध मानसिकतेशी अधिक आहे, असे लक्षात येते.

लैंगिक अत्याचारांच्या संदर्भात २०१९ सालच्या अखेरपर्यंतची उपलब्ध असणारी जागतिक आकडेवारी अभ्यासली असता, दर एक लाख लोकसंख्येमागे असलेले लैंगिक बळजबरीच्या घटनांचे प्रमाण बघितले तर दक्षिण आफ्रिका त्यांत आघाडीवर दिसते. प्रत्येकी एक लाख लोकांपैकी १३२ महिलांवर लैंगिक बळजबरी झाल्याची अधिकृत नोंद तिथे झाली आहे. त्या खालोखाल, बोट्सवाना, स्वीडन, ऑस्ट्रेलिया आदी देशांचा क्रमांक लागतो. दक्षिण आफ्रिकेतील 'साऊथ आफ्रिकन मेडिकल रीसर्च कौन्सिल'ने अलीकडेच एक सर्वेक्षण केले होते. प्रामुख्याने पुरुषांशी संवाद साधून लैंगिक अत्याचाराविषयी जाणून घेण्याचा त्यामध्ये प्रयत्न करण्यात आला. त्या पार्श्वभूमीवर, दक्षिण आफ्रिकेतील Eastern Cape आणि KwaZulu-Natal या भागांतील सुमारे दोन हजार पुरुषांशी संवाद साधण्यात आला. यातील प्रत्येकी चार पुरुषांमागील एकाने आयुष्यात कधी ना कधी एक किंवा एकाहून अधिक महिलांचे लैंगिक शोषण किंवा त्यांच्यावर लैंगिक बळजबरी केल्याची कबुली दिली. संवाद साधलेल्या पुरुषांपैकी सुमारे ३० टक्के पुरुषांनी महिलेवर अथवा मुलीवर लैंगिक बळजबरी केलेली होता. त्यातील तीन टक्के पुरुष असेही होते ज्यांनी समलिंगी लहान मुलांवर किंवा पुरुषांवर लैंगिक अत्याचार केलेले होते. वयाच्या विशीत पोहोचेपर्यंत किमात एकदा लैंगिक बळजबरी केलेल्या युवकांची संख्याही दक्षिण आफ्रिकेत मोठी आहे. असुरक्षित शरीरसंबंध आणि एकापेक्षा अधिक लोकांसमवेत लैंगिक संबंध असल्याकारणाने तिथे एड्स या रोगाचे प्रमाणही अधिक आहे. जगाच्या तुलनेत सर्वाधिक लैंगिक अत्याचार या देशात होतात. लैंगिक अत्याचारांच्या गुन्ह्यांची अधिकृत नोंद होण्याचे व खटला चालून संबंधित गुन्हेगारांना शिक्षा मिळून अत्याचार पीडितेला न्याय मिळण्याचे प्रमाणही तिथे अत्यल्प आहे.

'वर्ल्ड पॉप्युलेशन रिव्ह्यू'च्या ताज्या माहितीनुसार, गेल्या दोन दशकांत भारतातील लैंगिक बळजबरीच्या प्रकरणांत दुप्पट वाढ झालेली आहे. अर्थात, हा अंदाजसुद्धा पोलिसांकडे अधिकृतपणे नोंद झालेल्या

प्रकरणांच्या उपलब्ध आकडेवारीवरून काढण्यात आलेला आहे. प्रत्यक्षातील आकडेवारी ही त्यापेक्षाही अधिक असू शकते, असा या क्षेत्रातील अभ्यासकांचा दावा आहे. लैंगिक बळजबरीच्या एकूण घटनांपैकी केवळ एक चतुर्थांश घटनांचीच नोंद पोलिसांकडे अधिकृतपणे होत असते. त्यामुळे अनेक प्रकरणे घडूनसुद्धा त्या संदर्भात पुढे काहीही होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. सामाजिक प्रतिष्ठा गमावण्याची भीती, लोकलज्जा, लैंगिक बळजबरी केलेल्या पीडित व्यक्तीला समाजाकडून आधार मिळण्याऐवजी मिळणारी अपमानास्पद वागणूक आणि सातत्याने सोसावी लागणारी अवहेलना अशा अनेकानेक कारणांमुळे लैंगिक अत्याचार झाल्यानंतर अनेक महिला समोर येण्यास धजावत नाहीत. हे चित्र केवळ भारतापुरतेच मर्यादित आहे असे नाही तर, प्रगत म्हणवल्या जाणा-या देशांपासून ते अगदी विकसनशील आणि गरीब अशा सर्वच देशांत हेच चित्र दिसते.

'नॅशनल क्राइम रेकॉर्डस् ब्यूरो'ने (एनसीआरबी) अलीकडेच भारतातील लैंगिक बळजबरी प्रकरणांची आकडेवारी जाहीर केली आहे. त्या नुसार, गेल्या १७ वर्षांच्या कालावधीत लैंगिक बळजबरीच्या व लैंगिक शोषणाच्या, विनयभंगाच्या भारतातील प्रकरणांमध्ये दुपटीने वाढ झालेली आहे. सन २००१ ते २०१७ या कालवधीत देशभरात लैंगिक बळजबरीच्या चार लाखांहून अधिक प्रकरणांची अधिकृतपणे नोंद झाली. प्रत्यक्षात ही संख्या दिसते त्याहीपेक्षा वास्तवामध्ये किती तरी अधिक असावी, असा सामाजिक अभ्यासकांचा कयास आहे. देशातील एकूण महिलांपैकी सरासरी ६७ महिलांवर दररोज कुठे ना कुठे तरी लैंगिक बळजबरी होतात, असे भारतातील आकडेवारीतून समोर येते. त्यामुळे देशातील हे चित्र धक्कादायक तर आहेच; परंतु, ज्या वेगाने लैंगिक अत्याचारांमध्ये वाढ होते आहे ते प्रमाणही चिंताजनक आहे. भारतात २००१ साली अतिप्रसंग, अत्याचार, विनयभंग या संदर्भातील १६ हजार तक्रारी पोलिसदरबारी दाखल झाल्या होत्या. पुढील दशकभरात ही संख्या दुपटीने वाढून ३२ हजारांवर गेली.

या संदर्भात राज्यनिहाय आकडेवारी बघितली तर असे दिसते की, गेल्या दोन दशकांत लैंगिक बळजबरीच्या सर्वाधिक घटना मध्यप्रदेशात उघडकीस आल्या आहेत. त्या खालोखाल, उत्तरप्रदेश आणि राजस्थान



येथे लैंगिक बळजबरीच्या घटनांची नोंद झाली आहे. लैंगिक बळजबरीच्या घटना वाढण्याच्याबाबतीत अन्य राज्येही आघाडीवर असल्याचे दिसून येते. लैंगिक बळजबरीच्या घटनांचे प्रमाण गोवा राज्यात सर्वाधिक वाढते आहे. त्या खालोखाल, उत्तराखंड, मेघालय, अंदमान-निकोबार, केरळ, दिल्ली, राजस्थान, हरियाना, ओडिशा, आसाम, उत्तरप्रदेश, सिक्कीम, हिमाचल प्रदेश, मणिपूर, मध्यप्रदेश यांचा क्रमांक लागतो. अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात लैंगिक बळजबरीच्या एकूण घटना कमी आहेत आणि गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढीचे प्रमाणही कमी आहे. बिहार, तमिळनाडू, मिझोराम, त्रिपुरा आणि नागालँड या राज्यांतही गेल्या काही वर्षांपासून लैंगिक बळजबरीच्या घटनांचे प्रमाण कमी होत असल्याचेही या अहवालातून स्पष्ट करण्यात आले आहे.

Thomson Reuters Foundation या संघटनेच्या वतीने दोन वर्षांपूर्वी करण्यात आलेल्या एका जागतिक सर्वेक्षणामध्ये महिलांना कोणते

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

देश असुरक्षित वाटतात आणि लैंगिक अत्याचारांची सर्वाधिक भीती कोणत्या देशाच्या संदर्भात त्यांना वाटते याचा शोध घेण्यात आला होत्या. या संदर्भात भारत सर्वाधिक असुरक्षित वाटत असल्याचे मत बहुसंख्य महिलांनी त्यामध्ये नोंदवलेले होते. या खेरीज, अफगाणिस्तान, सीरिया, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया असे अनेक देश आहेत जिथे राहताना लैंगिक अत्याचाराच्या भीतीने स्त्रिया स्वतःला असुरक्षित मानतात. आपल्यावर लैंगिक अत्याचार झाले तर आपल्याला कुणाकडूनही न्याय मिळणार नाही, अशीही भावना बहुसंख्य वेळा महिलांच्या मनात घर करून राहिल्याचे दिसते. असे असल्यामुळेच असेल कदाचित, परंतु, लैंगिक अत्याचारानंतर तक्रार दाखल करणा-या महिलांचे प्रमाण एकूणच जगभरात कमी आहे. लैंगिक अत्याचारांना सामोरे जावे लागणा-या महिलांपैकी केवळ ४० टक्के महिलाच न्याय मिळवण्यासाठी पुढे पाऊल उचलण्याचे धाडस दाखवतात, असे जागतिक आकडेवारीतून लक्षात येते. त्यामुळे, लैंगिक बळजबरीची अनेक प्रकरणे समोरच येत नसल्याने ती तशीच दडपली जातात. लैंगिक बळजबरी झालेल्या महिलेकडे पाहण्याची समाजाची दृष्टी निकोप नसते, तिला समाजात स्वीकारले जात नाही. तिच्यावर अन्याय झालेला असतानाही तिलाच अवहेलनेला सामोरे जावे लागते. त्यामुळे, लैंगिक बळजबरी झाल्यानंतर पुन्हा तो मानसिक त्रास तरी नको म्हणून अनेकदा महिला पुढे येत नाहीत. समाजात पुन्हा 'छी-थू' होण्याची आणि बदनामी होण्याची भीती असल्याने आयुष्यभर गप्प राहून जगणा-या पीडित महिलांची संख्याही मोठी असावी, असा अंदाज आहे. एकाच व्यक्तीकडून वारंवार लैंगिक अत्याचार सहन करणा-या आणि तोंडाला कायमचे कुलूप लावून जगणा-या महिलांचेही प्रमाण खूप आहे.

लैंगिक बळजबरी झाल्यानंतर गुन्हा दाखल होऊन प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यानंतर न्याय मिळण्यास होणारा विलंब हेदेखील एक मोठे भीषण वास्तव आहे. ही परिस्थिती भारतासारख्या देशातच आहे असे नव्हे तर, जगभरातील बहुतांश देशात कमी-अधिक प्रमाणात अशीच परिस्थिती आहे. इंग्लंडमध्ये २०१९ साली लैंगिक बळजबरीच्या जितक्या घटना घडल्या त्या प्रकरणांपैकी केवळ १.५ टक्के प्रकरणांमध्ये प्रत्यक्षात निकाल लागला



आणि त्यात गुन्हेगारांना शासनही झाले. लैंगिक अत्याचार झाल्याची प्रकरणे न्यायालयात गेल्यानंतर त्यांचा निकाल लागण्यासाठी भारतातसुद्धा पुष्कळ वर्षे जातात. भारतात अलीकडे उघड झालेल्या लैंगिक बळजबरीच्या प्रकरणानंतर, महिलांच्या हक्कांबाबत आणि त्यांच्यावरील लैंगिक अत्याचारांच्या विरोधात महिला संघटनाही आता अधिक आक्रमक झालेल्या आहेत. त्यामुळे, अशा प्रकरणांकडे होणारे दुर्लक्ष किंवा अशी प्रकरणे दडपून टाकण्याचे प्रयत्न कमी होतील अशी आशा आहे. महिलांचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे आणि त्यांच्या आत्मसन्मानाची जपणूक करायला हवी, ही जाणीव आता समाजामध्ये वाढू लागली आहे.

लैंगिक बळजबरीच्या अनेक प्रकरणांमध्ये पीडित महिला खोटे बोलते आहे आणि स्वतःच्या स्वार्थासाठी लैंगिक बळजबरीचे कारण पुढे करीत आहे असा पोलिसांचा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन अनेकदा दिसून येतो, अशी टीका सामाजिक क्षेत्रात काम करणा-या कार्यकर्त्यांकडून वारंवार होताना दिसते. लैंगिक बळजबरी प्रकरणी तक्रार नोंदवून घेतानाही पोलिस टाळाटाळ करतात, जाणीवपूर्वक त्यात विलंब करतात किंवा अनेकदा तक्रारच दाखल करून घेतली जात नाही, असे अनेक प्रकरणांमध्ये दिसून आलेले आहे. लैंगिक अत्याचारप्रकरणी महिला खोट्या तक्रारी दाखल करतात या पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनाला मात्र कोणताही आधार नसल्याचे आकडेवारीतून समोर येते. विकसित देशांमध्ये लैंगिक बळजबरीची जितकी प्रकरणे समोर आलेली आहेत त्यापैकी ९१ टक्के महिलांच्या तक्रारींमध्ये तथ्य होते. याचा अर्थ केवळ नऊ टक्के महिलांच्या तक्रारींमध्ये तथ्य नव्हते. त्यामुळे लैंगिक बळजबरी प्रकरणात महिला सरसकटपणाने खोट्या तक्रारी दाखल करतात, असे मानणे योग्य नाही. सामाजिक दबावाची आणि सोसाव्या लागणा-या अवहेलनेची पर्वा न करता जेव्हा एखादी पीडित महिला समोर येण्याचे धाडस दाखवते तेव्हा संशयाची सुई तिच्यावरच रोखली गेली किंवा तिच्यावर अविश्वास दाखवला गेला तर त्याचा आघात तिच्या मनोधैर्यावर होतो. लैंगिक बळजबरी प्रकरणात अनेकदा महिला पुढे येण्यास धजावत नाहीत, त्याचे मुख्य कारण हेच असावे. त्यामुळे लैंगिक अत्याचाराच्या अनेक घटना बरेचदा अंधारातच राहतात.

लैंगिक अत्याचार झाल्याची तक्रार पोलिसांकडे केल्यानंतर प्रकरण अतिशय संवेदनशील रीतीने आणि संबंधित महिलेच्या आत्मसन्मानाला धक्का न लागता कसे हाताळले जाईल हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. परंतु बहुतांश प्रकरणांमध्ये असे होत नसल्याचेच चित्र दिसते. लैंगिक बळजबरी प्रकरणात ठोस पुरावे प्राप्त होणे हे जगभरातील सर्वच न्यायिक प्रक्रियांपुढील एक सर्वांत मोठे आव्हान ठरते आहे. अलीकडच्या काही वर्षांत बलात्काराच्या जितक्या घटना ब्रिटनमध्ये न्यायप्रविष्ट होत्या त्यापैकी जवळपास निम्म्या महिलांनी आपल्या तक्रारी न्यायालयातून मागे घेतल्या. न्यायिक प्रक्रिया ज्या संवेदनशीलतेने होणे अपेक्षित आहे तसे न झाल्याने आणि आत्मसन्मानाला धक्का बसत असल्याने, आपली अवहेलना होते आहे, या भावनेतून पीडित महिलांनी आपला दावा मागे घेतला, असे या संदर्भातील वास्तव सांगते. मात्र, या संदर्भात जर्मनीने एक आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे. लैंगिक बळजबरी झालेल्या महिलेला न्यायप्रक्रियेदरम्यान कोणत्याही मानसिक त्रासाला सामोरे जावे लागणार नाही याची पुरेपूर दक्षता घेण्यावर तेथील न्यायव्यवस्थांनी भर दिला आहे. अमेरिकेसह अनेक देशांतील न्यायव्यवस्थांनी याची वाखाणणी केली आहे.

लैंगिक बळजबरीचे प्रकार रोखण्यासाठी आणि असे प्रकार घडल्यानंतर ते सुयोग्य रीतीने हाताळण्यासाठी अतिशय काटेकोर नियोजन आवश्यक आहे. या संदर्भात, युरोपातील बेल्जियम येथील Policy Department मधील Citizens Rights and Constitutional Affairs या व्यासपीठाने एक अहवाल तयार केलेला आहे. लैंगिक बळजबरी झालेल्या कोणत्याही महिलेला विविध पातळ्यांवर मानसिक आधार कसा देता येऊ शकतो आणि त्यासाठी जागतिक स्तरावर यशस्वी ठरलेल्या सर्वोत्तम पद्धती कोणकोणत्या आहेत, तत्काळ कोणत्या उपाययोजना करता येऊ शकतात या विषयीची माहिती त्यांत एकत्रितपणे सविस्तर मांडलेली आहे. शारीरिक, मानसिक आरोग्य सांभाळण्यासाठी लगेच उचलायची पावले, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व सामाजिक स्तरावर पीडित व्यक्तीला आवश्यक असणारा मानसिक आधार यांचा प्रामुख्याने त्यात विचार करण्यात आलेला आहे.



लैंगिक बळजबरीच्या संदर्भातील न्यायप्रविष्ट प्रकरण हाताळत असताना एका बाजूला संबंधित महिलेचा आत्मसन्मान जपणे आणि त्याच वेळी त्या घटनेमागील वास्तव जाणून घेत पुराव्यांच्या आधाराने न्याय करणे अशी दुहेरी कसरत न्यायालयांना पार पाडावयाची असते. चौकशी दरम्यान उलटतपासणी करीत असताना, न्यायालयासमोर पुरावे सादर करीत असताना आणि वाद-प्रतिवाद करीत असताना महिलांची बेअदबी होऊ नये याची दक्षता राखणे आवश्यक आहे. तसेच, अशा प्रकरणांचे निवाडे बंदिस्त दालनात होऊन त्या बाबतीत कुठेही जाहीर वाच्यता होणार नाही याचीही दक्षता घेतली जाणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने, आता न्यायपालिकाही पावले उचलत असल्याचे आश्वासक चित्र दिसते आहे. लैंगिक अत्याचारांसंबंधातील जगभरातील हे वास्तव खचितच अस्वस्थ करणारे आहे. त्याच बरोबर, समाजाच्या अनिष्ट मानसिकतेचे दर्शनही यातून घडते. लैंगिक बळजबरी ही एक मानसिक विकृती असून त्यामध्ये वर्चस्ववादी पुरुषी मानसिकता दडलेली आहे. महिलांवर आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी किंवा अनेकदा पूर्ववैमनस्यातून बदला घेण्यासाठी महिलांवर लैंगिक बळजबरी केली जाते. समाजातील हे चित्र बदलायचे असेल तर शालेय जीवनापासूनच लैंगिक शिक्षण देण्याबरोबर महिलांविषयीचा आदर आणि स्त्री-पुरुष समानता यांची बीजे मुलांच्या मनात रुजवली जाणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, लैंगिक बळजबरीच्या कोणत्याही संबंधित गुन्ह्याची तत्परतेने दखल घेतली जाऊन तो पोलिसांकडे नोंदवला जाणे, पीडित महिलेला मानसिक आधार देणे, ते प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यानंतर निकाल लागेपर्यंतच्या प्रक्रियेमध्ये तिचा आत्मसन्मान जपला जाणे आणि समाजानेही अशा प्रकरणांतील गंभीर व करुणास्पद वास्तव लक्षात घेऊन संबंधित महिलेला दोषी न समजता तिला मानसिक आधार देणे गरजेचे आहे. लैंगिक बळजबरी प्रकरणांत न्याय मिळण्यास होणारा विलंब कमी व्हावा आणि असे गुन्हे करण्यास कुणीही धजावू नये म्हणून दोषी ठरणाऱ्या गुन्हेगारांना कठोर शासन व्हावे, अशा अपेक्षा समाजशास्त्रज्ञांनी व्यक्त केल्या आहेत. हे घडून आले तर, महिलांवरील लैंगिक अत्याचारांना निश्चितपणे पायबंद बसू शकेल, अशी आशा आहे. ■■

*(पृष्ठ क्रमांक १२ वरून)*

राज्यातील विद्यमान सार्वजनिक आरोग्य सेवेसंदर्भात उपरोक्त विवेचनादरम्यान सुचविण्यात आलेली व्यवस्था एका वर्षात राबविता येणे शक्य नाही, हे तर उघडच आहे. परंतु, त्यांपायी प्रस्तुत योजना डोळ्यांआड केली जाणे अथवा तिच्या अंमलबजावणीदरम्यान काही तडजोड होऊ होणे हे उभय धोके टाळण्याच्या दृष्टीने या ठिकाणी एक बाब सुचवावीशी वाटते. या योजनेच्या तामिलीसाठी जेवढा म्हणून संभाव्य कालावधी आवश्यक ठरेल त्या कालावधीसाठी राज्य सरकारने एक कायदा मंजूर करून सुनिश्चित आराखडा निर्धारित करावा. जिल्ह्यांच्या लोकसंख्येच्या आधारे नव्याने उभारावयाच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या, तालुका पातळीवरील रुग्णालयांची संख्या त्या आराखड्यामध्ये निर्देशित केली जावी. तसेच, राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये आजघडीला कार्यरत असलेल्या रुग्णालयांची क्षमता, तेथील सेवांची गुणवत्ता उंचावण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीचा तपशीलही त्या आराखड्यात असावा. परिचारिकांच्या रिकाम्या जागा एका फटक्यात भरणे कदाचित शक्य होणार नाही. पुरेसे प्रशिक्षण न लाभलेल्या उमेदवार परिचारिका सेवेमध्ये दोन वर्षांच्या कालावधीनंतर कायम होण्याचा सध्याचा परिपाठ भविष्यातही चालू राहू नये यासाठी परिचारिकांचा परिवीक्षा कालावधी पाच वर्षांचा असावा. वैद्यकीय महाविद्यालयांमधून शिकून बाहेर पडणा-या डॉक्टरांना त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये दोन वर्षे सेवा बजावल्यानंतरच अंतिम पदवी प्रदान करण्यात यावी.

ही सारी व्यवस्था दशकभराच्या काळात सुविहितपणे कार्यरत व्हावी अथवा होईल अशी अपेक्षा. त्यासाठी जनसामान्यांनी तिच्या अंमलबजावणीबाबत आजच आग्रह धरावयास हवा. ■■

**संदर्भ :**

1) https://www.scientificamerican.com/article/animals-use-social-distancing-to-avoid-disease1/

2) https://www.worldaware.com/resources/blog/virtual-kidnapping



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### अर्थबोधपत्रिका मासिक : वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८०० /- रुपये** |

# ग्रंथालयातील नवीन पुस्तके

## Essays on the Econometrics of Consumer Behaviour

**By - R. Radhakrishna,**
**ACADEMIC FOUNDATION, NEW DELHI in association with Centre for Economic and Social Studies (CESS), Hyderabad & Institute of Public Enterprises, Hyderabad, 2019, pp.575.**

प्रचंड स्तरीकरण हे भारतीय अर्थव्यवस्थेचे एक मुख्य वैशिष्ट्य आहे. उत्पन्न, रोजगार, उपभोग, बचत, खरेदी, उत्पादन यांसारख्या विविध आर्थिक क्रिया-प्रक्रिया भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये लोकसंख्येतील निम्न, मध्यम आणि उच्च गटांमध्ये विभागलेले आहे. 'ग्रामीण' आणि 'शहरी' या प्रादेशिक विभिन्नतेचे गुणात्मक परिमाणही या स्तरीकरणात सर्वत्र नांदताना दिसते. उत्पादनतंत्राचा वापरदेखील 'पारंपरिक' आणि 'आधुनिक' अशा दुपेडी स्वरूपाचा आहे. स्तरीकरणाच्या अशा विविध कप्प्यांत भारतीय उपभोक्ता विभागला गेलेला आहे आणि त्यामुळे देशी अर्थव्यवस्थेत ग्राहकांकडून निर्माण होणा-या मागणीच्या स्वरूपातदेखील मोठ्या प्रमाणात भिन्नता आहे. या मागणीमध्ये सूक्ष्म स्तरावर होणा-या बदलांचा अभ्यास प्रस्तुत ग्रंथात मांडलेला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे रचनात्मक पैलू लक्षात घेऊन किंमती आणि उत्पन्न यांचा कुटुंबांच्या उपभोगावर होणारा परिणाम व प्रभाव, तसेच अन्नधान्याच्या किंमतीमध्ये होणा-या बदलांमुळे ग्रामीण भागातील विविध उत्पन्न गटांच्या उपभोगामध्ये घडून आलेले बदल यांचादेखील अभ्यास सुयोग्य अशी 'इकॉनॉमेट्रिक मॉडेल्स' वापरून करण्यात आलेला आहे. देशाचे कृषि धोरण ठरवताना पुढील काही वर्षांतील मागणीचा अंदाज बांधण्यात येतो. त्या दृष्टीने, अन्नधान्यपिकांच्या किंमतीनुसार होणारे उपभोगातील बदल आणि उत्पन्नातील पुनर्वितरणाचे परिणाम लक्षात घेऊन भविष्यकालीन मागणीसंदर्भात अंदाज कसे बांधले जातात याचा सविस्तर आणि शास्त्रीय अभ्यास या ग्रंथात मांडलेला आहे. धोरणकर्ते, विश्लेषक, अर्थशास्त्राचे विद्यार्थी, संशोधक यांच्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त ठरावा असा आहे. ■■



**RNI Regn.No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**